## नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक १७५/२०२१ मधील निशाण ९३ वरील आदेश

१. अर्ज व म्हणणे वाचले.

२. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली.

३. उभयपक्षकारांचा युक्तिवाद ऐकला.

४. वादी यांचे अर्जातील कथनांप्रमाणे प्रतिवादी क्र.११ शहाजी विष्णू पाटील यांचे नांव दावा मिळकतीच्या ७/१२ रेकॉर्डला नोंद असल्याने त्यांनी दावा दाखल करताना त्यांना पक्षकार केले होते. परंतु, दाव्याचे समन्स व नोटीस गेलेनंतर प्रतिवादी क्र.११ हे मयत झाल्याचे वादी यांना बेलीफ रिपोर्टवरुन समजले. त्यामुळे, त्यांनी माहिती घेतली असता प्रतिवादी क्र.११ हे दावा दाखल करण्यापूर्वी दि.२१.०१.२०२१ रोजी मयत झाल्याचे वादी यांना नुकतेच समजून आले आहे. वादी यांचे कथनांनुसार अर्जात नमूद केलेले वारस हेच प्रतिवादी क्र.११ यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे, वादी यांनी अर्जात नमूद केलेले प्रतिवादी क्र.११ यांचे वारस अभिलेखावर घेणेबाबत विनंती केली आहे. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी या अर्जास हरकत घेतली आहे. परंतु, वादी यांनी अर्जाचे पुष्ट्यर्थ ॲफिडेव्हीट सादर करुन अर्जातील कथने शपथेवर कथन केली आहेत. त्यामुळे, वादी यांनी त्यांचे अर्जामध्ये केलेल्या कथनांमध्ये तथ्य दिसून येते. निशाण ९८ वरील मृत्यू दाखला पाहता प्रतिवादी क्र.११ हे दि.२१.०१.२०२१ रोजी म्हणजेच दावा दाखल करण्यापूर्वी मयत झाल्याचे दिसून येते. वादी यांचे कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र.११ यांना अर्जात नमूद केलेले वारस हे सरळ व कायदेशीर वारस आहेत. वादी यांनी हे कथन शपथेवर केले आहे. वादी यांनी हा दावा डिक्लेरेशन, वाटप व ताकिदीसाठी दाखल केला आहे. त्यामुळे, दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र.११ यांचे वारसांविरुध्द दाव्याचे कारण पुढे चालू राहते. सबब, या कामी प्रतिवादी क्र.११ यांचे अर्जात नमूद केलेले वारस अभिलेखावर घेणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक व जरुरीचे

आहे. त्यामुळे, मी खालील आदेश पारित करीत आहे-

**आ दे श**

१. वादी यांचा निशाण ९३ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. मयत प्रतिवादी क्र.११ यांचे अर्जात नमूद केलेले वारस अभिलेखावर घेणेसाठी वादी यांना परवानगी देणेत येत आहे.

३. वादी यांनी आज पासून १४ दिवसांचे आत दाव्यामध्ये योग्य ती दुरुस्ती करावी व अभिलेखावर दाव्याची दुरुस्त प्रत दाखल करावी.

-

Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2022.03.25 17:29:53 +0530

**दिनांक २४/०३/२०२२.** **(डी.एम.हिंग्लजकर)**

**ठिकाणः विटा.** **३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,विटा,**

**ता. खानापूर, जि.सांगली.**

Case No : RCS. No. 175 of 2021
I affirm that the contents of this pdf file Order are same words as per original Order,
Name of the Stenographer : S.V.Gaikwad,
Court Name: 3rd Joint Civil & Criminal Court, Vita, Dist.Sangli.
Date of decision : 24.03.2022
Order signed by P.O.on : 25.03.2022
Order uploaded on : 25.03.2022.